ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 10 | JUNE - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# मल्हारराव होळकर - उत्तर हिंन्दूस्थानच्या राजकारणातील एक जाणकार व्यक्तीमत्व

**प्रा. डॉ. व्ही.जी. वसु**
**इतिहास विभाग प्रमुख , डॉ. एच.एन. सिन्हा महाविद्यालय,**
**पातूर, जि. अकोला.**

## प्रस्तावना :



होळ या गावी १६ मार्च १६९३ रोजी मल्हारराव होळकर यांचा जन्म झाला. मल्हाररावच्या उदयाच्या दृष्टीने बाळजी विश्वनाथची दिल्ली मोहिम अत्यंत महत्वाची ठरली. या मोहिमेतच पेशवा आणि त्याचा मुलगा बाजीराव यांच्याशी मल्हाररावाची ओळख झाली. मल्हाररावांच्या गुणाची ओळख पेशव्यांना झाली. म्हणुनच आपल्या गुणाची पारख पेशव्याकडे होणार हे लक्षात घेवुन पेशव्याच्या नोकरीत जाण्याचा प्रयत्न मल्हाररावांनी केला. बापुजी प्रभुच्या मध्यस्थीने मल्हाररावाने पेशव्यांकडे इस. १७२१ च्या सुमारास नौकरीकरीता अर्ज केला. बाजीरावने ताबडतोब मल्हारराव होळकरांची नियुक्ती चिमाजी आप्पाच्या पदरी केली. इ.स. १७२५ च्या सुमारास पेशव्याने ५०० स्वारांची मनसब दिली.

माळावा मोहिमेकरीता मल्हारराव होळकरांनी पेशव्याला मोलाची मदत केली. म्हणुन पेशव्याने उत्तरेकडील मोहिमेची जबाबदारी मल्हाररव होळकर व राणोजी शिंदे यांच्यावर सोपविली. उत्तरेकडील मोहिमेत राजपुतान्यातील प्रकरण महत्वाचे आहे. यावेळी राजपुतन्यात बुंदी प्रकरण उदभवले त्यामुळे मराठयांना राजपुतान्यात प्रवेश करण्यास वाव मिळाला. बुंदी येथे बुधसिंगाची सत्ता होती. परंतु सवाई जयसिंगाने बुधसिंगचे राज्य जिंकुन घेतले या परिस्थितीत बुधसिंगाला प्रतापसिंगची मदत झाली. प्रतापसिंगला मराठयांकडे पाठविण्यात आले. प्रतापसिंगाने साताऱ्यास जावुन छत्रपती शाहुंची भेट घेतली परिणामी शाहुने मल्हारराव होळकर आणि राणोजी शिंदे यांना प्रतापसिंगास मदत करण्याची आज्ञा केली. त्यानुसार मल्हारराव होळकर व राणोजी शिद्यांनी २२ एप्रिल १७३४ रोजी बुंदीवर आक्रमण केले. व होळकराचा विजय होवुन बुंदीचा किल्ला मराठयांच्या नियंत्रणाखाली आणला. मराठयांची मदत सर्वतोपरी आपणास होत रहावी म्हणुन बुधसिंगाच्या पत्नीने मल्हाररावांना आपला भाऊ मानले.

माळवा, गुजरात, बुंदेलखंड येथे मराठयांचा प्रभाव वाढीस लागला होता. म्हणुन मुगल बादशह अस्वस्थ झाला होता. मराठयांना माळवा व राजपुतांमधुन घालवून देण्याकरिता वजीर कमरूद्दीन खान व मिरबक्षी खान दौरान यांच्या नेतृत्वात सैन्य पाठविण्याचे ठरविले. खान दौरान व त्याचे सैन्य रामपुरा येथे पोहचले फेब्रुवारी १७३५ ला रामपुऱ्याजवळ मल्हारराव व खानदौरान यांचे सैन्याची दृष्टादृष्ट झाली व मल्हारररावने मुगलांच्या सैन्याला वेढयात ठेवले. त्यानंतर मल्हारररराव होळकरांनी राजपुतान्यावर चढाई केली. बुंदी व कोटा येथे लुटालुट केल्यानंतर मल्हाररवांच्या सैन्याने जयपुर व जोधपुरवर चढाई केली. व त्यानंतर सांबरवर चढाई केली. व सांबर येथील लुटीत मल्हाररावास विपुल संपत्ती मिळाली. खानदौरानाचा जबरदस्त पराभव करण्यात आला. अशाप्रकारे उत्तरेत यश संपादन केल्यानंतर मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे दक्षिणेतस आले. त्यानंतर शिंदे, होळकर यांनी शहापुरच्या मार्गाने मारवाडमध्ये प्रवेश केला. १ एप्रिल १७३६ रोजी मल्हारराव होळकर व राणोजी शिंदेसह मेडते येथे पोहचले प्रतापसिंग हाड मारवाडचा उमेदसिंग आणि भांडारी यांच्यशी बोलणी करण्याकरिता पाठविले परंतु ही बोलणी अयशस्वी झाली. त्यानंतर मल्हाररावाने मेडतेवर चढाई केली. व मेडते शहर मराठयांनी जिंकले.

बाजीराव पेशव्यांनी दिल्ली मोहिमेच्या प्रवासात भोपाळगडास वेढा दिला होता. त्यानंतर भोपाळच्या वेढयाची जबाबदारी बाजीरावने मल्हाररावाकडे सोपविली. मल्हाररावाने भोपाळचा यारमोहम्मदचा पराभव केला. व त्यांच्याकडून ५ लक्ष रू. घेऊन त्यांच्याही तह केला. त्यानंतर मल्हाररावचा दोआबमध्ये प्रवेश झाला. दोबाबमध्ये प्रवेश केल्यानंतर मल्हाररावाने शुकोहाबादेस वेढा दिला. तेथील लालजी खत्री या किल्लेदाराने मल्हाररावाला दिड लक्ष रूपये व एक हत्ती देवुन आपला बचाव केला. त्यानंतर मल्हाररावाने इतिमादपुर, फिरोजाबाद इत्यादी दोआबातील ठाणी जाळपोळ करून लुटले सांदतखान व सफदरजंग या दोघांनी होळकरांच्या सैन्यावर हल्ला चढविला. मल्हरराव व त्यांचे बहुके

सैन्य सुखरूपपणे ग्वाल्हेरजवळ कोटिला येथे बाजीरावच्या सैन्यांना जावुन मिळाले. मुगल व मराठे युध्दाला प्रारंभ झाला. बाजीराव पेशव्याने मलहरराव होळकरांच्या नेतृत्वाखाली राणोजी शिंदे, तुकोजी पवार, जिवाजी पवार, गोविंद हरी, यांनी मोगलास कापुन काढले. निजमाच्या हालचालीवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी व त्याला उत्तरेतुन कोणतीही मदत प्राप्त होवु नये अशी दुहेरी जबाबदरी मल्हाररावावर होती. अश्यास्थितीमध्ये मीरमानी खानने आपल्या क्षेत्रातील मराठा कामविसदारांच्या ठाण्यावर हल्ला चढविला. ही बातमी कळताच मल्हारराव व राणोजी शिंदेनी मिरमानीखानवर आक्रमण केले व त्याचा पराभव केला. त्यानंतर सफदरजंग व दुर्जनसाल यांच्यावर मल्हाररावाने चढाई केली. व त्यांचा पराभव केला. १५०० ते २००० मोगल सैन्य ठार झाले.

२२ जानेवारी १७३८ रोजी मल्हारराव व शिंदे यांनी कोटयावर चढाई करण्यासाठी पाठविले. कोटयाचा दुर्जनसालचा पराभव करण्यात आला. दुर्जनसालने मराठयांना १० लक्ष रूपये देण्याचे कबुल केले. एकंदरीत निजामाला मदत करण्याकरीता निघलेल्या दुर्जनसालला मल्हारराव होळकराने चांगला धडा शिकविला. उत्तरेत केलेल्या कार्यामुळे मल्हारराव होळकरांचे नाव फारच गाजले. कारण उत्तरेतुन निजामाला मदत मिळु न देण्याची जबाबदारी मल्हाररावाने यशस्वीपणे सांभाळली. मोगलबादशहावर मराठयांचा वचक निर्माण झाला. पालखे्ड व भोपाळ या दोन्ही संग्रामात बाजीराव पेशवा निजामापेक्षा श्रेष्ठ ठरला. य दोन्ही युध्दात मल्हारराव होळकर यांनी अत्यंत महत्वाची भुमिका बजावली. वेगाने मजल मारून जावे, विजेच्या चपळाईने श्त्रुपक्षावर हल्ला चढविणे. ही निती मल्हाररावाने आत्मसात केली. मल्हारराव होळकरांचे शौर्य व पराक्रम वेळोवेळी उत्तरेच्या राजकारणात प्रत्ययास येते. होळकर व शिंदे या दोन्ही सरदरांना बाजीराव आपल्याबरोबर अडचणिच्या आणीबाणीच्या प्रसंगी ठेवीत असत. विशेष करून मल्हारराव प्रथमपासुनच बाजीरावच्या तालमीत तयार झाला होता. म्हणुनच गनिमी काव्याच्या बाबतीत मल्हारराव होळकर बाजीरावचे पट्टशिष्य बनले.

### संदर्भ सुची :-

१. ठाकूर वा.वा. - संपा - होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग १
२. ठाकूर वा.वा. - संपा - होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग २
३. पगडी सेतू माधव - पानिपत संग्राम भाग १
४. पारसनिस द.ब. - दिल्ली येथील मराठयांची राजकारणे भाग २.
५. इंगळे डॉ. राम. - अहिल्याबाई होळकर
६. गुजर डॉ. यादव - मल्हरराव होळकरआणी त्यांचा काळ
७. शेजवळकर त्र.श. - पानिपत १७६१
८. इंगळे डॉ.राम - मावळते मल्हारराव व उदयोन्मूख महादजी
९. पवार जयसिंगराव - मराठेशाहीचा मागोवा
१०. बेहरे ना.के. - पहिले बाजीराव पेशवे.